वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

# मुख्यमंत्री योगींना माहित नाही, त्यांचा निम्मा उत्तर प्रदेश मुंबई अन् पुण्यात नोकरीला आलाय

## भाजपावाले अजून बटेंगे तो कटेंगे मध्ये अडकलेला आहे-जयंत पाटील



दिव्य वार्ता

बीड, (दिव्य न्युज):- राज्यात विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरू आहे. प्रचारादरम्यान सर्वच राजकीय पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत टोलेबाजी करताना दिसत आहेत. यातच आता, जग एवढे पुढे गेले, पण भारतीय जनता पक्षवाले अजून 'बटेंगे तो कटेंगे'मध्येच अडकलेले आहेत. दुनिया खूप पुढे गेली आहे, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते जयंत पाटलील यांनी भाजपला लगावला आहे. एवढेच नाही तर, ...याचा अर्थ क्लिअर आहे. भारतीय जनता पक्षाच्या ५० पेक्षा जास्त जागा महाराष्ट्रात निवडून येणार नाहीत, अशी भविष्यवाणीही त्यांनी यावेळी केली. ते बीडमध्ये प्रचारसभेत बोलत होते.

पाटील म्हणाले, काळ बदललेला आहे. जातीवर आणि धर्मावर हे निवडणूक नेत आहेत. बटेंगे तो कटेंगे म्हणणाऱ्यांना मी एवढेच सांगतो की, ही अठराव्या-एकोणिसाव्या शतकातली भाषा आहे. आपण आता २१ व्या शतकात आलोय. २१ व्या शतकात लोकं फार पुढे गेली आहेत. ते इलॉन मस्क नावाचा एक माणूस आहे, जगातल्या सगळ्या नव्या नव्या संशोधन करून प्रयोग करण्याचा त्याचा हातखंडा आहे. तो आता काय विचार करतोय माहिती आहे का? तो विचार करतोय की, मंगळावर इंटरनेट कसं चालू करता येईल? याचा विचार पृथ्वीवर, इलॉन मस्क करतोय आणि त्यासाठी आता प्रयोग करण्याचं काम त्यांनी सुरू केलेले आहे. जग एवढं पुढे गेलं, पण भारतीय जनता पक्ष वाले अजून 'बटेंगे तो कटेंगे' मध्ये अडकलेले आहेत. दुनिया खूप पुढे गेली आहे.

▶▶ पान २ वर

## गेवराई मतदार संघात मतदारांचा एकच नारा

# कहो दिल से लक्ष्मण पवार फिरसे

## प्रेषित मोहंमद पैगंबर साहेब यांच्या विषयी बेशिस्त वक्तव्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा म्हणणारे पहिले आमदार



### मराठा समाजाला तात्काळ आरक्षण द्या असे म्हणणारे लक्ष्मण पवार हे पहिले आमदार

## मतदार संघात मतदारांचा एकच नारा लक्ष्मणआण्णांना निवडून आणून करूया भयमुक्त गेवराई मतदारसंघ सारा

**गेवराई, (दिव्य न्युज):- मराठा आरक्षणासाठी आपल्या आमदार पदाचा राजीनामा देणारे आणि तेही सत्ताधारी पक्षाचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार हे पहिलेच आमदार होते ज्यांनी आपल्या मराठा बांधवांसाठी राज्य सरकारने तात्काळ आरक्षण द्यावे यासाठी आपल्या आमदार पदाला लाथ मारून समाजासाठी झटणारे एकमेव आमदार.... प्रेषित मोहंमद पैगंबर यांच्या विषयी अपशब्द वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई करा म्हणत राज्या शासनाला पत्र देणारे ते पहिलेच आमदार असे या धर्मनिरपेक्ष चेहरा म्हणून गेवराई मतदार संघात अपक्ष उमेदवार म्हणुन निवडूक लढवत असलेले लक्ष्मण पवार यांच्या विषयी मतदार संघात सहानुभूतीची लाट निर्माण झाली असून आपल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात अनेक दर्जेदार विकास कामे करणारे आमदार म्हणुन परिचित असलेल्या लक्ष्मण पवार यांची हॅट्रिक होणार असुन तिसऱ्यांना गेवराईचे मतदार त्यांना आमदार करून महाराष्ट्राच्या विधानसभेत गेवराई मतदार संघाचा प्रतिनिधी म्हणुन पाठविणार आहेत अशीची परिस्थिती सध्या गेवराई मतदार संघात दिसुन येत आहे.**

मतदार संघातील जनतेच्या अडी अडणीला अहोरात्र धावून जावून मदतीचा हात पुढे करणारे लक्ष्मण पवार यांना मोठ्या प्रमाणात मताधिकाऱ्यांचा वाढता प्रतिसाद मिळत असून गेवराई मतदार संघात विकासासाठी नेहमीच 'धहाडणेवाला' एक वो टायगर जो की आत्ताच्या निवडणूकीत सर्व खेळ पलटानेवाला है... अब ना रूकेंगा, लक्ष्मण पवार.... जनतेका रखवाला है... कारण, गेवराई मतदार संघात पंडितांचे राजकारण अत्यंत गलिच्छ झाले आहे तसेच गेवराईत सध्या भयभीत वातावरण असून या पंडितांमुळे गेवराई हे बिहार आणि युपीलाही मागे टाकणार आहे अशी काहींशी चर्चा मतदारात होत असून गुंडशाही, दडपशाही व जुलूमशाही पासून गेवराईला मुक्त करण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांना येणाऱ्या २० तारखेला भरभरून मतदान

▶▶ पान २ वर

## कोरोनाच्या कार्यकाळात केलेली कामे आणि दिलेली मदत मतदार विसरणार नाहीत

राज्यात कोरोनाची महामारी संपूर्ण जिल्हाभरात पसरली यामध्ये गेवराई तालुक्याचाही समावेश होता. तालुकयातील अनेकजण कोरोना बाधीत झाले, लॉकडाउन असल्याने अनेकजण बेरोजगार झाले, गोर गरीबांचा तर अन्न पाण्याचा प्रश्न निर्माण झाला अशा या कठीण काळात आ.लक्ष्मण पवार यांनी आपल्या परिणे जेवढे जास्त करता येईल तेवढी जास्त मदत आपल्या मतदार संघातील नागरीकांना केली. रूग्णांना रूग्णालयात सर्व उपचार मिळावे यासाठी प्रयत्न केले. अनेक गोर गरीबांना हजारो टन अन्न धान्य पोहंच केले. अनेक बेरोजगारांना आर्थिक मदत केली असल्या या कठीण काळात स्वतःचे जिव धोक्यात टाकून मतदार संघातील मतदारांसाठी धडपडणारे आणि त्या कठीण काळात मतदारांना मदत पोहचंविणाऱ्या या जिगरबाज आमदाराला मतदार विसणार नाहीत.

# मराठा आरक्षणासाठी आपल्या आमदारकीचा राजीनामा देणारे लक्ष्मण पवार पहिले आमदार

### अनाधिकृत वाळू उपसा:-


अनाधिकृत रित्या वाळू उपसा करणाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल. वाळूमाफीयांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांचे सुद्धा बंदोबस्त करण्यात येईल.

### युवक आणि रोजगार:-

युवकांसाठी छोट छोटी स्थानिक लघु उद्योग उदयोगासाठी लागणारे कर्ज, इतर सोयी उपलब्ध करून देण्यात येतील. नविन रोजगाराच्या संधी कौशल्यांना वाव देणारे स्थानिक काम, युवकांना रोजगार सक्षम बनविण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल.

### -:पंडितांच्या दडपशाहीतून मुक्तता:-

संपूर्ण माझा मतदारसंघ आज पंडितांच्या दारात तासन तास त्यांची वाट बघत बसतो, पण त्यांची भेट सांगितलेल्या दिवशी सांगितलेल्या वेळेला आणि सांगितलेल्या ठीकाणी कधीच होत नाही.. दोन चार प्रयत्नानंत्र भेट झाली तर काम होईल किंवा व्यवस्थीत गन्हाणे ऐकले नाईल याची काही गैरंटी नाही. आणि महत्वाचा मुद्दा म्हणजे भेटणाऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर असणारे भय, दडपण आणि गुलामगीर असल्यासारखे वातावरण हे मला बदलून काढायचे आहे. सर्वसामान्य व्यक्ती माझ्यापर्यंत पोहोचला पाहीजे आणि त्याने आपले मन मोकळ्या मनाने व्यक्त केले पाहिजे, त्यासाठी खास तरतुद आणि पहिल्याच भेटीत कामः सर्वसामान्यांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी हेल्पलाईन नंबरची तरतुद.



# बीड मतदार संघाच्या विकासासाठी आ.संदीप क्षीरसागरांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा

## हाजी नसीम इनामदार यांचे आवाहन

बीड, (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदार संघातआपल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात अनेक विकास कामे करणारे विकासाची जाण असणाऱ्या बीड विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संदीपभैय्या क्षीरसागर यांना प्रचंड मताधिक्य देवून दुसऱ्यांना बीड विधानसभा मतदारसंघात दर्जेदार विकास कामे करण्यासाठी निवडून द्यावे असे आवाहन बीड नगर पालिकेचे माजी उपनगराध्यक्ष हाजी नसीम इनामदार यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले आहे.



पत्रकात पुढे म्हंटले आहे की आज राज्यात जातीयवादी शक्तींनी तोंडवर काढले असून या शक्तीकडून अल्पसंख्याक समाजाला टार्गेट करण्यात येत आहे. राज्यात महाआघाडीच्या उमेदवारांना मतदान करून विजयी करावे असे आवाहन ही अनेक धर्मगुरूंनी केले असून त्यांच्या आदेशाचे पालन करत सर्व मतदारांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्या तुतारी वाजविणारा माणुस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. विरोधकांकडे कोणताच विकासाचा मुद्दा नसून फक्त मागील ३५ वर्षाचा विकासाचे काम केल्याचे दाखवून मत मागण्याशिवाय दुसरे काहीच नाही. मागील ३५ वर्षात विकासाच्या नावाने शहराला भकास करणाऱ्यांना मतदान न करता महाआघाडीचे उमेदवार संदीपभैय्या क्षीरसागर यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. हाजी इनामदार यांनीर संपूर्ण शहरात मतदारांच्या गाठीभेटी लक्ष दिले असून प्रत्यक्षे गाठीभेटीवर भर देत मतदारांना तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबण्याचे आवाहन ते करत आहेत. त्यांच्या या गाठीभेटीमुळे संदीप क्षीरसागर यांची ताकद वाढली असून येणाऱ्या २० तारखेला सकाळी लवकर उठून आपल्या मतदान केंद्रावर जावून संदिप क्षीरसागर यांना मतदान करण्याचे आवाहन ही त्यांनी केले आहे.

# मजलीस उलेमा बीडच्या वतीने आवाहन; योग्य उमेदवाराला मतदान करा



बीड, (दिव्य न्युज):- विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी अंतीम टप्प्यात आहे. त्या अनुषंगाने बीड येथील कुल जमाती तंजीम व मजलीस उलेमा बीड यांच्या वतीने मुस्लिम समाजाने १००% मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन करण्यात आले आहे. समाजाला जो उमेदवार योग्य वाटेल, काबिल असेल अशा उमेदवाराला मतदान करावे असेही यावेळी सांगण्यात आले.

बीडयेथील मजलीस उलेमा व कुल जमाती तंजीम यांनी बैठकीच्या माध्यमातून मुस्लिम समाजाला आवाहन केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दि. २० नोव्हेंबर रोजी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा. १००% मतदान होईल यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन करण्यात आले आहे.यावेळी मत दान करणाऱ्यांची जबाबदारी याविषयी माहिती देण्यात आली. मतदान करणे हे सर्वांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. प्रत्येकाने घराबाहेर पडून मतदानाचा हक्क बजवावा, यावेळी कोणत्याही पक्षाचे, उमेदवाराचे नाव घेण्यात आलेनाही. समाजाला जोयोग्य उमेदवार वाटतो त्याला मत द्यावे असे आवाहन यावेळी कुल जमाती तंजीम व मजलीस उलेमा बीड यांच्या वतीने करण्यात आले.

### अजित पवार यांना पाडण्याचं आवाहन करणार का?

# अजून बारामतीत गेलो नाही!

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अनेक जाहीर सभा महाराष्ट्रात झाल्या. मात्र त्यांनी एकाही सभेत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यावर टीका केली नाही. हाच धागा पकडत, शरद पवारांनी मिश्किल टीपणी केलीय. मोदी माझ्यावर टीका करत नाहीत हीच माझ्यासाठी चिंतेची बाब आहे, असं शरद पवार म्हणाले. शरद पवारांनी एबीपी माझाला दिलेल्या एक्स्लुझिव्ह मुलाखतीत अनेक मुद्द्यांवर रोखठोक भाष्य केलंय. अजित पवार यांना पाडा असं आवाहन तुम्ही बारामतीकरांना करणार का, सुप्रिया सुळे मुख्यमंत्री होणार का, वोट जिहादचा मुद्दा, प्रतिभा पवार प्रचारात कशा, अशा अनेक मुद्द्यांवर शरद पवारांनी मतं मांडली.

शरद पवार म्हणाले, मोदी माझ्यावर टीका करत नाहीत ही माझ्यासाठी चिंतेची बाब आहे. गेल्या निवडणुकीत ज्या ज्या वेळी मोदी आले,माझ्यावर टीका केली आणि आमच्या जागा वाढल्या. म्हणूनच मी त्यांना निमंत्रण दिले की, मोदीजी, महाराष्ट्रात या आणि तुमच्या मन की बात बोला. त्यामुळे आमच्या जागा वाढतील. पण त्यांच्या सल्लागाराने सांगितले असावं की शरद पवारांना महाराष्ट्रात भाष्य करू नका. माझ्यावर बोलणे बंद आहे, पण राहुल गांधी आणि इतर नेत्यांवर टीका करणं सुरुच आहे. जसं प्रधानमंत्रीपदाचा सन्मान आम्ही ठेवला पाहिजे, तसचं विरोधी पक्षनेता पदाचा मान त्यांनी ठेवला पाहिजे.



▶▶ पान २ वर

## प्रचार वाहने सुसाट; आरोप -प्रत्तयारोपांच्या फेरीसोबत बैठकांवर भर

# प्रचारासाठी उरले तीन दिवस; अपक्षांमुळे प्रमुखांची डोकेदुखी



बीड, (दिव्य न्युज):- विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, उमेदवारांना ५००० प्रचारासाठी आता केवळ तीन दिवस उरले आहेत. त्यामुळे प्रमुख उमेदवारांसह अपक्ष उमेदवारही प्रचारात धावपळ करीत आहेत. सर्वांचीच प्रचार वाहने सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुसाट धावताना दिसत आहेत. यासोबतच बैठका, सभांच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही झडू लागल्या आहेत. सध्या तरी अपक्ष उमेदवार हे प्रमुख उमेदवारांची डोकेदुखी ठरू पाहात आहेत. कारण त्यांचाही प्रचार प्रमुख उमेदवारांच्या बरोबरीने सुरू आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

जिल्ह्यातील बीड, परळी, आष्टी, केज, माजलगाव आणि गेवराई मतदारसंघातून १३९ उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक ३४ उमेदवार माजलगावात, तर सर्वांत कमी ११ उमेदवार परळी मतदारसंघात आहेत. अधिकृत पक्षांशिवाय ८१ अपक्ष उमेदवारही रिंगणात आहेत. यामध्ये केज आणि परळीत दुरंगी लढत होत आहे. येथे अपक्ष उमेदवार फारसे दावेदार नाहीत. परंतु माजलगाव, बीड, आष्टी आणि गेवराई येथे तुल्यबळ उमेदवार आहेत. त्यामुळे लढत रंगतदार होत आहे. प्रमुख उमेदवारांच्या बरोबरीने त्यांचाही प्रचार होताना दिसत आहे. प्रमुख उमेदवारांसाठी राज्याचे, देशाचे नेते येऊन सभा घेत आहेत. परंतु अपक्ष उमेदवार 'एकला चलो रे'च्या भूमिकेत असून, छोट्या- मोठ्या सभांच्या माध्यमातूनच प्रचार करताना दिसत आहेत. सध्या प्रचारात सर्वांनीच आघाडी घेतल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

### कोणत्या मतदारसंघात कशा लढती?

केज मतदारसंघात भाजपच्या नमिता मुंदडा आणि शरद पवार गटाचे पृथ्वीराज साठे, तर परळीत अजित पवार गटाचे धनंजय मुंडे आणि शरद पवार गटाचे राजेसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत होत आहे. गेवराईत अजित पवार गटाचे विजयसिंह पंडित, ठाकरे गटाचे बदामराव पंडित आणि अपक्ष उमेदवार लक्ष्मण पवार यांच्यात लढत होत आहे.

आष्टीत भाजपचे सुरेश धस, अजित पवार गटाचे बाळासाहेब आजबे, अपक्ष भीमराव धोंडे आणि शरद पवार गटाचे महेबूब शेख यांच्यात लढत होत आहे. माजलगावात अजित पवार गटाचे प्रकाश सोळंके, शरद पवार गटाचे मोहन जगताप, अपक्ष रमेश आडसकर यांच्यात लढत होत आहे. बीडमध्ये अजित पवार गटाचे डॉ. योगेश क्षीरसागर, शरद पवार गटाचे संदीप क्षीरसागर, तिसऱ्या आघाडीचे कुंडलिक खांडे आणि अपक्ष अनिल जगताप यांच्यात लढत होत आहे.

# क्षीरसागरांना राजकारणातून हद्दपार करण्यासाठीच आम्ही एकवटलो

## अनिलदादांना आम्ही विधानसभेत पाठविणारच-सुरेश नवलेंचा विश्वास



बीड, (दिव्य न्यूज): क्षीरसागरांना राजकारणातून हद्दपार करण्यासाठीच आम्ही एकवटलो आहोत, त्यामुळे आम्ही पुर्ण ताकतीनिशी अनिल दादांना विधान सभेत पाठविणार आहोत, असा विश्वास माजी मंत्री सुरेश नवले यांनी बोलून दाखविला आहे. शुक्रवारी माजी मंत्री सुरेश नवले यांनी हॉटेल निलकमलमध्ये पत्रकार परिषद घेतली, यावेळी ते संवाद साधत होते.यावेळी अॅड बाळासाहेब राख, रामभाऊ पवार, कृष्णा बोमीकर, शिवलाल मुळूक,

चंद्रकांत नवले यांच्यासह आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, ही परिवर्तनाची निवडणूक आहे, वाऱ्याची हळूवार झुळूक आहे, परिवर्तनाची झुळूक या निवडणूकीत दिसणार आहे. आ. संदिप क्षीरसागर बांबा कार्यकाळ दर्दभरा राहिलेला आहे. यातून अनेकांना चटके सहन करावे लागले. त्यामुळे क्षीरसागरांना राजकियदृष्टट्या हद्दपार करणे हा संकल्प पुर्ण होणार आहे. मनोज जरांगे पाटलांचे १४ महिणे आंदोलन सुरू होते, मराठधांना कायम बनवासात पाठविण्याचा संकल्प महायुतीच्या नेत्यांनी केलेला आहे, हे आमच्या चांगलेच लक्षात आलेले आहे. अनिल जगताप यांनी जरागे पाटलांचे शिलेदार म्हणून काम केलेले आहे. त्यांच्याविषयी मतदार संघात सहानभुती आहे, त्यामुळेच आम्ही सर्व जण एकत्र आलो असून दादांना विधानसभेत पाठविणार आहोत, विशेष म्हणजे जयदत्त क्षीरसागर यांचा खरा चेहरा या निवडणूकीत उघडा पडला आहे. ते जातीवंत जातीवादी असल्याचा शिक्कामोर्तब झाला आहे. जात आणि कुटूंबाच्या पलिकडे ते कधीच गेले नाहीत, २०१९ च्या निवडणूकीत अनिल जगतापांनी त्यांचे काम केले, त्यामुळे जयदत्त क्षीरसागरांचा पाठींबा अनिल जगतापांना मिळायला हवा होता. मात्र त्यांनी तसे केले नाही, दोन्ही पुतण्यांनी त्यांना अतिशय शांतपणे घरी बसविले आहे. जयदत्त क्षीरसागर यांचा जातीबाद पाहण धान्य झाली, अनिल दादांनीही माझे काम केले होते, त्यामुळेच यावेळी मी त्यांना पाठिंबा दिला आहे, आणि त्यांना निवडूणच आणणार असल्याचेही यावेळी श्री. नवले यांनी म्हटले आहे.

# टीईटीमधील गैरप्रकार परीक्षा परिषदेकडून चौकशी

## केंद्रातील सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी करणार

बीड, (दिव्य न्युज):-शहरात १० नोव्हेंबर रोजी झालेल्या टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परिषदेत एका केंद्रावर गैरप्रकार झाल्याची तक्रार काही परिक्षार्थ्यांनी केली होती. त्यानंतर आता ही तक्रार शिक्षणाधिकाऱ्यांनी राज्य परिक्षा परिषदेकडे पाठवली आहे. त्याची परीक्षा परिषदेकडून चौकशी होणार आहे.

३ वर्षांपूर्वी झालेल्या परीक्षेत अनेक गैरप्रकार समोर आले होते. त्यामुळे यावर्षी परीक्षा परिषदेने सुरक्षेच्या दृष्टीने मोठी काळजी घेतली होती. प्रत्येक केंद्रात सीसीटीव्ही, उमेदवारांचा चेहरा, बोटांचे ठसे स्कॅन व हॅड मेटल डिटेक्टरने तपासणी केली जात होती. दरम्यान, बीड शहरातील एका परीक्षा केंद्रावर दोन परिक्षार्थ्यांना त्या केंद्रातीलच काही शिक्षकांनी उत्तरे पुरवल्याचा प्रकार घडला होता. याबाबत इतर परिक्षार्थ्यांनी लेखी तक्रार मुख्याध्यापकांकडे दिली होती. मात्र, मुख्याध्यापकांनी दुसऱ्या दिवशीही ही तक्रार शिक्षण विभागाकडे सुपूर्द केली नव्हती. 'दिव्य मराठी'ने याबाबत वृत्त प्रकाशीत केल्यानंतर शिक्षण विभागाने याची दखल घेत मुख्याध्यापकांना बोलावून घेतले. त्यांच्याकडे आलेली तक्रार शिक्षण विभागाकडे घेतली. ही तक्रार परिक्षा परिषदेकडे पाठवली आहे. आता या प्रकरणाची राज्य परीक्षा परिषदेकडून चौकशी होणार आहे. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही असल्यामुळे असा काही प्रकार झाला का, पर्यवेक्षकाशिवाय वर्गात कोण आले होते, किती वेळ थांबले याची पडताळणी होणार आहे.

# मतदारसंघाच्या विकासातून जनतेचा विश्वास कमावलाय,विरोधकांकडे लक्ष देऊ नका

## पक्षप्रवेश प्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांचे कार्यकर्त्यांसह मतदारांना आवाहन



बीड (दिव्य न्युज):- बीड विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षातील अनेक युवक कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.१६) राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र मस्के यांच्या संपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी आ. संदीप क्षीरसागर म्हणाले, बीड मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असताना मागील पाच वर्षात लोकांच्या समस्या जवळून जाणता आल्या, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून विविध योजनांचा लाभ मिळवून दिला. लोकप्रतिनिधी म्हणून हे कर्तव्य बजावले. मतदारसंघाच्या विकासातून आपण जनतेचा विश्वास कमावला आहे. म्हणून येत्या २० तारखेला मतदान करताना अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून पुन्हा एकदा आपल्या सेवेची संधी द्या,असे आवाहन आ.क्षीरसागर यांनी केले.

शनिवारी बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र मस्के यांच्या संपर्क कार्यालयात आ. संदीप क्षीरसागर, राजेंद्र मस्के, माजी आ. सय्यद सलीम व इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भाजपच्या युवक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी सर्वांचे आ. संदीप क्षीरसागर यांनी पक्षात स्वागत केले. आगामी काळात आपल्या खांद्याला खांदा लावून बीड मतदार संघाच्या विकासासाठी काम करू. आपल्या सर्वांचे आशीर्वाद आणि सदिच्छा माझ्या कायम पाठीशी असून बीड मतदारसंघाला विकासाच्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी आपण सोबत मिळून काम करू अशी ग्वाही त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिली.

यावेळी आ.संदीप क्षीरसागर म्हणाले,दिलेला शब्द पाळून विश्वास सार्थ ठरवल्याने मतदारसंघातील मायबाप जनता कायम आपल्याला आशीर्वाद देत आलेली आहे आगामी काळातही मतदारसंघाच्या विकासाचे व्हिजन घेऊन आपण वाटचाल करणार आहोत. अशा वाटचालीत आपल्या सर्वांची योगदान नक्कीच ऊर्जादायी असणार आहेत. त्यामुळे सर्वांनी येत्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोर मतदान करून आपले अमूल्य मत द्यावे असे आवाहन केले. याप्रसंगी युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांचे उपस्थितीत आ. संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, राजेंद्र मस्के यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

## आ.संदीप भैय्यांना वाढता पाठिंबा अन पाठबळ

# ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनच्या बीड पदाधिकाऱ्यांनी दिला बिनशर्त पाठिंबा



बीड (दिव्य न्युज):- ऑल इंडिया मुस्लीम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अहेमद अन्सारी साहेब यांच्या आदेशावरून ऑल इंडिया मुस्लीम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशन बीड यांनी, बीड विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्ष, महाविकास आघाडी व मित्र पक्षाचे उमेदवार आ. संदीप क्षीरसागर यांना बिनशर्त पाठिंबा दिला. दरम्यान बीड मतदार संघात आमदार संदीप भैया यांना वाढता पाठिंबा आणि पाठबळ मिळत असल्याने त्यांचा विजय अधिक सुकर झाला आहे.सर्वांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

यावेळी ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर महेबुब, मणियार, मोमीन अब्दुल शाके, मोमीन खालिद अब्दुल राउफ, सय्यद फिरोज अली, तांबोळी शफिक, हाजी नसोमोदीन इनामदार, सलाम अब्दुल गफूर शेठ, कुरेशी इरफान अहमद बशीर, शेख ताहेर जाफर, खुर्शीद आलम, शेख वजीर चांद अत्तार, हाजी इकबाल कुरेशी, बागवान जलीम वजीर, शेख मोहसीन वजीर, शेख ताहेर शेख वाहेद, अब्दुल रहीम, ख्वाजा मिया शेख व इतर मान्यवरांनी मला जाहीर पाठिंबा दिला. आ. संदीप भैय्यांनी या सर्व मान्यवरांचे आभार मानते येणाऱ्या २० तारखेला मतदान करताना अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

पान १ वरून

### कहो दिल से

करून तिसऱ्यांना गेवराई मतदार संघाचे प्रतिनिधत्व करण्याची संधी गेवराईचे मतदार देणार आहेत. गेवराई शहरात आणि ग्रामीण भागात रस्ता, नाली व पिण्याचे पाण्याचे काम १०० टक्के करणारा हा आमदार आहे. दलित वस्ती असो किंवा अल्पसंख्याक वस्ती असो या वस्तीमध्ये अनेक दर्जेदार विकास कामे त्यांच्याकडुन करण्यात आलेले आहे. मुस्लिम कब्रस्तान, समाज मंदिर तथा तिर्थक्षेत्रांतर्गत अनेक देवस्थानचे कामे त्यांनी केले आहेत.

शिक्षण आणि आरोग्यः-

सर्व गोर गरिब जनतेच्या पाल्यांना इंग्रजी शिक्षण मिळविण्यासाठी प्रत्येक शाळेत सेमी इंग्रजी वर्ग इयत्ता पहिलीपासुन सुरू करू प्रत्येक गावात मान्यते प्रमाणे शिक्षक देण्याचा प्रयत्न करू. माध्यमिक शिक्षणानंतर तालुक्या- च्या ठिकाणी पुढील शिक्षणासाठी उदा.जेईई/एलईई किंवा व्यावसायिक शिक्षणासाठी मार्गदर्शन केंद्र. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसाठी वेळेवर बसची सोय व मुलींना मोफत पासची सोय. तसेबस व्यवस्थापकास पत्र देण्यात येईल.आरोग्याच्या सोयीसाठी प्रत्येक गाव स्वच्छ व सुंदर ठेविण्यासाठी प्रयत्न, व प्रत्येक पीएससी सेंटर वर डॉकटर विळेवर उपलब्धः गंभीर आजारावर ईलाज करण्यासाठी जिल्हा व उपजिल्हा रूग्णालय सज्ज -ठेवण्यात येईल. शासनाच्या प्रत्येक आरोग्य विषयक योजना राबविष्यात येतील त्यात कोणीटही भष्ट्राचार करणार नाही.

महिला सशक्तीकरण आणि सुरक्षाः-

महिलांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येईल. विविध शासकीय योजना गोर-गरीब महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात येईल. छोटे छोट व्यवसाय हस्तकला,पाककला, मशीनकाम, छोटे छोटे घरगुती लघुउद्योग त्यांना उपलब्ध करण्यात येईल.महिला सुरक्षेसाठी पोलीस स्टेशन मध्ये विशेष तक्रार निवारण केंद्र स्थापले जाईल.

शेतकरी आणि ग्रामविकास

शेतकऱ्यासाठी हमीभाव आणि कृषी उत्पादने विक्रीसाठी नवीन बाजारपेठा निर्माण केल्या जातील. आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेतीत सुधारणा आणि गोदावरी व सिंदफना नदीच्या पाण्याचे व्यवस्थीत व्यवस्थापन केले जाईल. जास्तीत जास्त भाग ओलीताखाली आणण्यास प्रयत्न

प्रत्येक गावाला मोठ्या गावांशी जोडण्यासाठी आपण रस्त्यांची अनेक कामे आणलीत व व्यवस्थीत दर्जेदार करण्यासाठी प्रयत्न देखील केलेला आहे. आणखीन रस्ते बनविण्यासाठी सज्ज राहू माझ्या काळाऐवढी रस्ते कोणीही या मतदार संघात आणलेली नाहीत. पण विरोधक त्याच्या पासून सर्वसामान्यांना दूर भरकटत नेत आहेत.

### अजून बारामतीत

मोदी येतात आणि राहुल गांधींवर टीका करतात. हे लोकांना आवडत नाही

हसन मुश्रीफ आणि दिलीप वळसे पाटील यांना पाडा असं तुम्ही म्हणालात.परंतु अजित पवारांवर तुम्ही बोलला नाहीत? अजून मी बारामतीला गेलेलो नाही, परवा मी बारामतीला जाणार आहे. तिथं मी काय बोलणार हे आता तुम्हाला सांगणार नाही. तुम्ही दिलीप वळसे पाटील आणि हसन मुश्रीफ यांचा उल्लेख केला. हे दोघेही माझ्या पक्षाच्या तिकिटावर माझ्या फोटोसह भाजपच्या उमेदवाराच्या विरोधात निवडून आले होते. जनतेने त्यांना भाजपच्याविरोधात मत देऊन निवडून आणलं होतं. परंतु त्यांनी धोकाधडी केली आणि ते भाजपसोबत गेले. ज्यांच्याविरोधात आम्ही मतं मागितली त्यांच्यासोबत हे सत्तेत असल्यामुळे मी बोललो आहे. कारण लोकांच्या सोबत त्यांनी धोका केला आहे, असं शरद पवार म्हणाले.

राष्ट्रवादी अजित पवारांचे खासदार सुनील तटकरे यांनी दावा केला होता की अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शरद पवार आम्हाला पाठिंबा देण्याचं जाहीर करणार होते. त्याबाबत शरद पवार म्हणाले, विधानसभेच्या अधिवेशनच्या काळात हे सर्वजण मला भेटायला आले होते. त्यावेळी आपण भाजपसोबत या असं ते मला म्हणाले. मात्र मी त्यांच्यासोबत गेलो नाही. शेवटच्या दिवशी मी त्यांना पाठिंबा देणार होतो असं जर ते म्हणत असतील तर आत्ता तुम्हाला काय दिसत आहे? मी त्यांना पाठिंबा दिला का? तर नाही.

# शरद पवारांच्या रडारवर बीड जिल्हा

## जयंत पाटील, आ. रोहित पवार यांच्या तर उद्या शरद पवारांची माजलगावात सभा

बीड, (दिव्य न्युज):- नेहमीप्रमाणे याही निवडणुकीत देशाचे नेते शरद पवार यांनी बीड जिल्हा आपल्या रडारवर घेतला आहे, त्या अनुषंगाने त्यांनी यापूर्वी बीड जिल्ह्यात परळी, आष्टी आणि बीड या ठिकाणी सभा घेतलेले आहेत, त्यांच्यानंतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी माजलगाव आणि केज मध्ये सभा घेतलेली आहे, तसेच काल सुप्रिया सुळे यांनी आष्टी येथे सभा घेतलेली आहे, त्याचप्रमाणे आज आष्टीत जयंत पाटील तर केजमध्ये आ. रोहित पवार यांची सभा होत आहे, तर उद्या शरद पवार यांची माजलगावात सकाळी अकरा वाजता सभा होणार आहे, यावरूनच त्यांनी आपले उमेदवार आ. संदीप क्षीरसागर, राजेसाहेब देशमुख, महेबुब शेख, मोहन जगताप आणि पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी मोठा डाव टाकल्याचे दिसून येत आहे. दरम्यान उद्याच्या सभेतून पवार काय आव्हान करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.